D.A.V. PUBLIC SCHOOL ,THANE

SESSION 2022-2023

PERIODIC TEST- III

SUBJECT- MARATHI (SET A)

STD -VIII **MAX.MARKS -40**

DATE - 22/12/2022 **TIME-**

सूचना : प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत .दोन्ही विभाग सोडविणे आवश्यक.

विभाग अ = 15 गुण . गद्यउतारा आणि व्याकरण

विभाग ब = 25 गुण . पाठावरील प्रश्न आणि गोष्ट्लेखन

विभाग -अ

प्रश्न १ खालील उतारा काळजी पूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . 5

माझ्या गावाला कृष्णा आणि कोयना नदीचा संगम होतो .यामुळे माझा गाव बारमाही पाण्याने सुजलाम सुफलाम असतो .पावसात तरी दोन्ही नद्यांची पात्रे भरून वाहत्तात .कृष्णा आणि कोयना दोन्ही मोठ्या नद्या आहेत .त्यामुळे कितीतरी छोट्या नद्या त्यांना येऊन मिळतात .माझ्या गावात नदीवर मोठे धरण बांधले आहे .त्यामुळे गावाबरोबरच आजूबाजूच्या दहा -बारा गावांना पाण्याचा मुबलक साठ होतो .माझ्या गावात ऊस आणि मळ्याची शेती पिकल्याने शेतकरी संपन्न आणि सधन आहेत .

प्रश्न १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा . (कोणतेही ५)

१ लेखकाच्या गावाला कोणत्या नद्यांचा संगम होतो ?

२ बारमाही पाण्याने गाव कसा होतो ?

३ नदीवर काय बांधले आहे ?

४ छोट्या नद्या कोणाला येऊन मिळतात ?

५ शेती पिकल्याने शेतकरी कसे आहेत ?

६ खेड्यातील गावकऱ्यांनी काय बांधले ?

प्रश्न २ खालील प्रश्नाचे पर्याय निवडा . 4

१ <u>आम्ही</u> फिरायला गेलो . या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा .

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

२ <u>ठाणे</u> सुंदर शहर आहे . या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

अ) नाम ब) सर्वनाम क) विशेषण ड) क्रियापद

३ विद्यार्थी <u>पटापट</u> उभे राहिले . या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

अ) नाम ब) विशेषण क) क्रियाविशेषण ड) शब्दयोगी अव्यय

४ समुद्राचे पाणी खोल आहे . या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा .

अ) नाम ब) विशेषण क) क्रियाविशेषण ड) शब्दयोगी अव्यय

प्रश्न ३ खालील प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा . 2

१ खालील वाक्यांपैकी वर्तमानकाळी वाक्य शोधा .

अ) त्याने पूजा केली . ब) तो पूजा करतो .

क) तो पूजा करेल . ड) तो पूजा केव्हा करेल ?

२ ' गणेश गावाला गेला .' या वाक्याचे योग्य भविष्यकालीन वाक्य ओळखा .

अ) गणेश गावाला जात आहे . ब) गणेश गावाला जाईल .

क) गणेश गावाला जात नाही . ड) गणेश गावी आहे .

प्रश्न ४ खालील प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा . (कोणताही १) 1

१ ' कुत्रा ' या शब्दाचा अनेकवचनी शब्द कोणता ?

अ) कुत्र ब) कुत्रे क) कुत्र्या ड) कुत्री

२ ' ससे ' या शब्दाचा एकवचनी शब्द कोणता ?

अ) सशानो ब) ससा क) सशीण ड) सासू

प्रश्न ५ खालील प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा . (कोणताही १) 1

१ ' पाहुणा ' या शब्दासाठीचा स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

अ) पाहूणी ब) पाहुणे क) पाहुना ड) पाहुण्या

२ ' गाय ' या शब्दासाठी पुलिंग शब्द कोणता ?

अ) गाई ब) बैल क) रेडा ड) गायी

प्रश्न ६ खालील प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा . 1

१ 'कुंज' या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा .

अ) कुजणे ब) वन क) कुंजा ड) कुंजर

प्रश्न ७ खालील प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा . 1

१ ' आंधळे ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा .

अ) डोळस ब) पांगळे क) डोळा ड) अंधार

विभाग -ब

प्रश्न ८ एका वाक्यात उत्तरे लिहा . (कोणतेही -५) 5

१ झुळूकेला स्वैर झुकावे का वाटते ?

२ वेळूच्या वनात अलगूज का वाजते ?

३ लेखिकेने उत्सुकतेने कुठे पाऊल टाकले ?

४ लेखिकेला निरोप देताना कोणता गजर झाला ?

५ प्रत्येक खोलीत कोण होते ?

६ ईशान खुश का झाला ?

प्रश्न ९ थोडक्यात उत्तरे लिहा . 12

१ वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे भावार्थ लिहा .

२ सर्वच प्राणी माणसाच्या प्रेमासाठी भुकेलेले असतात हे विधान पाठाच्या आधारे पटवून द्या .

३ पाठ अभ्यासल्यानंतर तुम्हाला जाणवणारी ईशानची गुणविशेष्ट्ये लिहा .

प्रश्न १० रिकाम्या जागा भरा . 3

१ त्यांना --------- गरज जाणवत होती .

२ वाटते सानुली --------- झुळूक मी व्हावे .

३ एका कुत्र्याच्या --------मोठ गळू झाल आहे .

प्रश्न ११ खालील पैकी कोणत्याही एका विषयावर गोष्ट लिहा . 5

कोल्हा -द्राक्षाच्या वेलीखालून जात असतो ----- खाण्याची अतिशय इच्छा होते -खूप उड्या मारतो -----द्राक्षे फार उंचावर ------ मिळत नाहीत ------ मनात दु:खी होतो ------ पण स्वत:ला समजावतो की ही द्राक्षे आंबटच आहेत .

किंवा

एका नदीवर एक अरुंद पूल --------- दोन्ही बाजूने एकाच वेळी एकेक बोकड येतात ------नदी पलिकडे जाण्यासाठी एकाला मागे जाणे जरुरीचे -------दोघेही भांडतात -------- पाण्यात पडतात ---------- थोड्या वेळानंतर ---------- दोन बकऱ्या येतात ------- त्यांनाही पलिकडे जायचे असते -------- त्यांना एक युक्ती सुचते ------- दोन्ही बकऱ्या आपापल्या मार्गाने जातात.

****